**कालमर्यादा / महत्वाचे**

क्र. पोमसं-३अ/१०/जीटी-२३/(पो.उप.नि/पो.नि.)/२६/२०२३
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १४/०३/२०२३.

संदर्भ :- १) सन-२०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि. २५/०६/२०१४ व,
२) सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०६/०४/२०१५.

विषय :- **तांत्रिक शाखेतील पोलीस अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२३.**
(i) राखीव पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक
(ii) पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी / वाहतूक)/ (भांडारपाल/विजतंत्री), व
(iii) मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षक (तांत्रिक व नौका विभाग)
(iv) आयुधिक पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक
(v) श्वान पथकातील पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक.

*-*-*-*-*-*

**परिपत्रक:-**

तांत्रिक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने संदर्भाधिन अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

२. तांत्रिक शाखेतील कार्यरत पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार ( महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश- २०१५ ) बदलीसाठी एका ठिकाणी ३ वर्षे कालावधी हा निश्चित करण्यात आलेला आहे.

३. **सर्वसाधारण बदल्या -२०२३ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात:-**

**अ) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी :-**

दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंत, किंवा त्यापुर्वी तांत्रिक शाखेतील कार्यरत संवर्ग निहाय पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांना सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयात तीन वर्षांचा विहीत कालावधी पुर्ण झालेला असेल, असे बदलीसपात्र पोलीस अधिकारी यांची माहिती त्यांच्या पंसतीच्या ठिकाणासह ( **विवरणपत्र - अ नुसार** ) या कार्यालयास पाठवावी.

**ब) विहीत कालावधी पुर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज :-**

ज्या पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांना सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्या पदावरुन व ठिकाणावरुन इतर ठिकाणी बदली हवी असल्यास त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह, व अशी बदली का पाहिजे याच्या सबळ कारणासह कागदपत्रांची छाननी व सत्यता तपासून अभिप्रायासह त्वरेने माहिती पाठवावी. **तसेच पदोन्नतीने पदस्थापना झालेल्या ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी संवर्ग बाह्य बदलीसाठी**

विनंती केली आहे, अशा पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४ जुलै, २०२१ मधील तरतुदींनुसार, त्यांच्या कार्यरत महसुल विभागात पदोन्नतीवर ०१ वर्ष पुर्ण झाला असल्याची आणि सदर अधिसूचनेत नमूद वैद्यकीय कारणे व संबंधित कागदपत्रांची खात्री करुनच त्यांची माहिती या कार्यालयास पाठवावी. ( विवरणपत्र - ब नुसार )

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी :-**

ज्या पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाचे क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ व क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएन/३२८/ २०१६, दिनांक ०८/११/२०१७ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन, त्यानुसार संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा. **( विवरणपत्र -क नुसार )**

४. **दिनांक १४/०३/२०२३ पूर्वी** या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज / प्रतिकूल अहवाल या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

५. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २(६A) नुसार पोलीस अधिका-यांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी मे महिन्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमुद केल्याप्रमाणे पोलीस अधिका-यांच्या बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्रं.२ यांच्याकडून त्या कालावधीत करणे सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातुन, सर्व संबंधीत घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे १) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी, २) मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज तसेच, ३) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाच्या पोलीस अधिकाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात ( **विवरणपत्र अ,ब व क**) मध्ये भरुन विहीत कालमर्यादेत **दिनांक ३१/०३/२०२२ पूर्वी न चुकता पाठवावी. कोणत्याही पोलीस अधिका-यांची माहिती पाठवावयाची राहून गेल्यास त्यास संबंधीत लिपीक व घटक प्रमुख हे जबाबदार राहतील. दिनांक ३१/०३/२०२३ नंतरच्या अर्जाबाबत विचार केला जाणार नाही, याची समज सर्व अधिका-यांना लेखी स्वरुपात देण्याची जबाबदारी संबंधीत घटकप्रमुखांची आहे.**

**६.** बदलीपात्र अधिकारी यांनी बदलीकरीता दिलेल्या पंसतीच्या ठिकाणीच त्यांची बदली होईल असे नाही. सदर अधिकाऱ्यांच्या बदलीकरीता उपलब्ध असलेली रिक्त पदे व प्रशासकीय निकड यानुसार त्यांच्या बदल्या करण्यात येतील. सदर बाब संबंधित घटक प्रमुखानी तांत्रिक शाखेतील पोलीस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

७) घटक प्रमुखांनी सदरची माहिती पाठवितांना, पद निहाय माहिती **Word Sheet मध्ये DVBW-TTSurekh (ISM V६) मध्येच** मराठीत टंकलिखीत करुन, परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणेच योग्य माहिती नमूद करुन, माहिती पेन ड्राईव्ह वर तसेच हार्ड कॉपी या कार्यालयातील **का.क्र.३-अ** मध्ये दिनांक ३१/०३/२०२३ पूर्वी निश्चितपणे पाठवावी. अन्य फॉन्टमध्ये प्राप्त झालेली माहिती ह्या कार्यालयातील संगणकावर उपलब्ध नसल्याने, ती भरण्यासाठी अधिक कालावधी लागत असल्याने, अशी माहिती स्विकारणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. **( विवरणपत्र अ,ब व क)**

८. खाली नमूद केल्याप्रमाणे, संबधित पदनामासमोर दर्शविल्यानुसार संबधित कार्यालयांनी पदनिहाय माहिती योग्य त्या मार्फतीने या कार्यालयास सादर करावी :-

| अ.क्र. | पदनाम | माहिती पाठविणारे घटक |
|---|---|---|
| १. | राखीव पोलीस निरीक्षक / राखीव पोलीस उपनिरीक्षक | संबधित घटक कार्यालय |
| २. | श्वान पथकातील पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक | |
| ३. | पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक (अभियांत्रिकी / वाहतूक / भांडारपाल / विजतंत्री ) | अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ४. | मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक (तांत्रिक व नौका विभाग) | विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फतीने माहिती या कार्यालयास सादर करावी. |
| ५. | पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक (आयुधिक ) | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.. |

९. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, वरिल परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्यानुसार ०३ प्रकारच्या स्वतंत्र याद्या तयार करुन, ह्या कार्यालयास सादर करताना, सदरची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता, कार्यासन क्र. ३-अ मध्ये देण्याबाबत, तसेच सदरची माहिती, या कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्री करण्याबाबतच्या सूचना संबंधीत लिपीक व टपाल ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

14/3/2023

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य.,मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य., मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, म.राज्य., पुणे .
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह )
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उपमहानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.राज्य., पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस ॲकडमी, नाशिक.
अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस नायगांव, बृहन्मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गासह )
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रें.

नमुना विवरणपत्र:- अ ( विहित कालावधी पूर्ण झालेले )
राखीव पोलीस निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक / पोलीस निरीक्षक ( वरिष्ठ श्वान अध्यापक ) / पोलीस निरीक्षक ( आयुधिक ) / राखीव पोलीस उप निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस उप निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस उप निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक ( श्वान अध्यापक ) / पोलीस उप निरीक्षक ( आयुधिक ) यांच्या सार्वत्रिक बदल्या- २०२३

| अ.क्र. | १. पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांचे नाव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | सेवातपशील | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | बदलीसाठी पंसतीची ३ ठिकाणे ( प्राथम्य क्रमानुसार नमूद करावी. ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | घटक | | | |
| १ | २ | ३ | | | ४ | | |
| १ | नाव :- रविंद्र एकनाथ पवार | पोलीस उप निरीक्षक | | | २०१७-१८ | A | १) विनंतीचे ठिकाण :-<br>१.<br>२.<br>३. |
| | | ०१/०६/२००९ | ३१/०५/२०११ | पो.प्र.के. खंडाळा | २०१८-१९ | B+ | |
| | | ०१/०६/२०११ | ३१/०५/२०१५ | नवी मुंबई | २०१९-२० | A | |
| | सध्याची नेमणूक :-<br>दिनांक ०६/०५/२०१७ पासुन पालघर | पोलीस निरीक्षक | | | २०२०-२१ | A | |
| | | ०१/०६/२०१५ | ३१/०५/२०१७ | लोहमार्ग नागपूर | २०२१-२२ | A+ | |
| | | ०६/५/२०१७ | ते आजपर्यंत | पालघर | | | |
| | मूळ जिल्हा :-सातारा | | | | | | |
| | सेवानिवृत्ती दिनांक<br>३१/११/२०२६ | | | | | | |

( घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी )

नमुना विवरणपत्र:- ब ( विनंती बदली )

राखीव पोलीस निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक / पोलीस निरीक्षक ( वरिष्ठ श्वान अध्यापक ) / पोलीस निरीक्षक ( आयुधिक ) / राखीव पोलीस उप निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस उप निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस उप निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक ( श्वान अध्यापक ) / पोलीस उप निरीक्षक ( आयुधिक ) यांच्या सार्वत्रिक बदल्या- २०२३

| अ.क्र. | १. पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांचे नाव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | सेवातपशील | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | बदलीसाठी पंसतीची ३ ठिकाणे ( प्राथम्य क्रमानुसार नमूद करावी. ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | घटक | | | |
| १ | २ | ३ | | | ४ | | |
| १ | **नाव :-** रविंद्र एकनाथ पवार | **पोलीस उप निरीक्षक** | | | २०१७-१८ | A | **१) विनंतीचे ठिकाण :-**<br>१.<br>२.<br>३. |
| | | ०१/०६/२००९ | ३१/०५/२०११ | पो.प्र.के. खंडाळा | २०१८-१९ | B+ | |
| | | ०१/०६/२०११ | ३१/०५/२०१५ | नवी मुंबई | २०१९-२० | A | |
| | **सध्याची नेमणूक :-**<br>दिनांक ०६/०५/२०१७ पासुन पालघर | **पोलीस निरीक्षक** | | | २०२०-२१ | A | |
| | | ०१/०६/२०१५ | ३१/०५/२०१७ | लोहमार्ग नागपूर | २०२१-२२ | A+ | **२. विनंतीचे थोडक्यात कारण :-** |
| | **मूळ जिल्हा :-**सातारा | ०६/५/२०१७ | ते आजपर्यंत | पालघर | | | |
| | **सेवानिवृत्ती दिनांक**<br>३१/११/२०२६ | | | | | | **३. घटक प्रमुखांचे अभिप्राय :-** |

❖ घटक प्रमुखांनी विनंती अर्ज व सोबतची कागदपत्रे पडताळून, सत्यता तपासून आपले अभिप्राय सादर करावे, तसेच विनंती अर्ज व कागदपत्रे सुध्दा विवरणपत्रासोबत सादर करावे.

( घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी )

**नमुना विवरणपत्र:- क ( प्रतिकूल अहवालावरुन बदली )**

**राखीव पोलीस निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक / पोलीस निरीक्षक ( वरिष्ठ श्वान अध्यापक ) / पोलीस निरीक्षक ( आयुधिक ) / राखीव पोलीस उप निरीक्षक / बिनतारी संदेश विभागातील पोलीस उप निरीक्षक / मोटार परिवहन विभागातील पोलीस उप निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक ( श्वान अध्यापक ) / पोलीस उप निरीक्षक ( आयुधिक ) यांच्या सार्वत्रिक बदल्या- २०२३**

| अ.क्र. | १. पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक यांचे नाव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | सेवातपशील | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | थोडक्यात कसुरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | घटक | | | |
| १ | २ | ३ | | | ४ | | |
| १ | **नाव :-** रविंद्र एकनाथ पवार | **पोलीस उप निरीक्षक** | | | २०१७-१८ | A | |
| | | ०१/०६/२००९ | ३१/०५/२०११ | पो.प्र.के. खंडाळा | २०१८-१९ | B+ | |
| | **सध्याची नेमणूक :-**<br>दिनांक ०६/०५/२०१७ पासुन पालघर | ०१/०६/२०११ | ३१/०५/२०१५ | नवी मुंबई | २०१९-२० | A | |
| | | **पोलीस निरीक्षक** | | | २०२०-२१ | A | |
| | | ०१/०६/२०१५ | ३१/०५/२०१७ | लोहमार्ग नागपूर | २०२१-२२ | A+ | |
| | **मूळ जिल्हा :-**सातारा | ०६/५/२०१७ | ते आजपर्यंत | पालघर | | | |
| | **सेवानिवृत्ती दिनांक**<br>३१/११/२०२६ | | | | | | |

❖ **घटक प्रमुखंनी या कार्यालयास प्रतिकूल अहवाल सादर करताना, तपशिलवार कसुरी अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावा.**

**( घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी )**